# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१९

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यात किडनी प्रत्यारोपणासाठीच्या असलेल्या जाचक अटी शिथील करण्याबाबत**

**(१) २०२२ (२३-१२-२०१४). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दरवर्षी किडनी प्रत्यारोपणासाठी चार लाख रूग्णांची नोंदणी केली जात असतांना शासनाच्या जाचक अटी आणि शर्तीमुळे केवळ एक टक्का रूग्णांवर किडणी प्रत्यारोपण करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किडणी प्रत्यारोपणास असलेल्या जाचक अटी व शर्ती शिथील करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१५-१२-२०१८) :**(१) नाही. राज्यात दरवर्षी सरासरी ७०९ रुग्णांनी किडणी प्रत्यारोपणासाठी नोंदणी केली असून त्यापैकी ५३ रुग्णांवर किडनी प्रत्यारोपण करण्यात आले आहे. म्हणजेच सरासरी ७% रुग्णांवर किडनी प्रत्यारोपण होत आहे.

(२) अवयव प्रत्यारोपणासाठीच्या अटी मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा, १९९४ व नियमावली, १९९५ नुसार आहेत.

तथापि जनहित याचिका ०५/२०१३ प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार राज्याबाहेरील रिलेटेड केसेस च्या अवयत प्रत्यारोपण संदर्भात त्या राज्याच्या राज्य ऑथोरायझेशन कमिटी कडील ना हरकत प्रमाणपत्र (NOC) आणण्याबाबतची अट २०१३ पासून शिथिल करण्यात आली आहे.

तसेच मा. लोकप्रतिनिधींनी अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रियेसाठीच्या प्रक्रियेमध्ये सुलभता आणण्यासाठी केलेल्या सूचनांच्या अनुषंगाने तज्ञांची बैठक आयोजित करुन ऑथोरायझेशन कमिटीकडून अवयव प्रत्यारोपणासाठी देण्यात येणाऱ्या परवानगीची वैधता ३ महिन्यांवरुन ६ महिन्यांपर्यात वाढविण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बसमत (जि.हिंगोली) तालुक्यात उपजिल्हा रुग्णालय व स्वतंत्र महिला रुग्णालय असतानाही रुग्णांची होत असलेली गैरसोय**

**(२) ५६२८ (०६-०४-२०१५). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बसमत (जि.हिंगोली) तालुक्यात उपजिल्हा रुग्णालय व स्वतंत्र महिला रुग्णालय असतानाही आरोग्य विभागाच्या गैर कारभारामुळे रुग्ण नांदेडला पाठविले जात असल्याने अत्यवस्थ आजाराच्या रुग्णांची गैरसोय होत असल्याचे दिनांक १८ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने यासंदर्भात चौकशी करुन येथील आरोग्यसेवा सुस्थितीत आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०४-०१-२०१९) :** (१) हे खरे नाही.

स्त्री रुग्णालय वसमत येथे दाखल झालेल्या गंभीर रुग्णांनाच नांदेड येथे संदर्भित करण्यात येते.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्रीगोंदा (जि. अहमदनगर) येथील ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदांबाबत.**

**(३) ४१६३६ (१०-०५-२०१६). श्री.राहूल जगताप (श्रींगोदा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहूल मोटे (पराडा), श्री.वैभव पिचड (अकोला), श्री.संदिप नाईक (ऐरोली), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा (जि. अहमदनगर) येथील ग्रामीण रुग्णालयातील पदे रिक्त असल्याने गरीब रुग्णांची गैरसोय होत असल्याचे दिनांक ३० डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाकडे गेले वर्षभर पाठपुरावा करुनही एकही पद भरले नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रुग्णालयातील पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-१२-२०१८) : (**१) हे अंशत: खरे आहे.

ग्रामीण रुग्णालय, श्रीगोंदा येथे गट अ ते ड मध्ये एकूण २७ पदे मंजूर असून २२ पदे भरलेली आहेत आणि ५ पदे रिक्त आहेत. यापैकी वैद्यकीय अधिक्षकाचे १ पद व गट-क ची ४ पदे

रिक्त आहेत. तथापि उपलब्ध वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून रुग्णांना आवश्यक उपचारात्मक सुविधा पुरविल्या जातात.

(२) गट अ मधील वैद्यकीय अधिक्षकाचे एकमेव रिक्त पद भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. तसेच वर्ग ३ व ४ ची रिक्त पदे वित्त विभागाच्या निर्देशानुसार ७५ टक्के पदे भरली आहेत.

(३) पदोन्नती, सेवानिवृत्ती, आंतरमंडळ बदलीमुळे रुग्णालयातील पदे रिक्त झालेली आहेत. तसेच वित्त विभागाच्या निर्देशानुसार आरोग्य सेवेशी निगडीत रिक्त पद ७५ टक्के भरण्यास मंजूरी असल्याने त्यानुसार डिसेंबर २०१७ पर्यंतची पदे भरण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील बोगस डॉक्टरांबाबत वैद्यकीय शिक्षण विभागाकडून माहिती देण्यास तसेच महाराष्ट्र वैद्यकीय व्यवसाय कायद्याच्या अंमलबजावणीस होत असलेला विलंब**

**(४) ४५७६३ (०३-०५-२०१६). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बोगस डॉक्टर, मान्यता नसलेल्या वेगवेगळ्या नावाने चालविल्या जाणाऱ्या वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या अनधिकृत संस्था, बेकायदा परिचारिका प्रशिक्षण संस्था यांच्यावर कारवाई करण्यासाठी वेळोवेळी आदेश काढणाऱ्या वैद्यकीय शिक्षण विभागाने राज्यातील बोगस डॉक्टरांची माहिती देण्यास नकार दिल्याची घटना माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनधिकृत वैद्यकीय शिक्षण देणाऱ्या संस्थांना पायबंद घालण्यासाठी सन १९६१ च्या महाराष्ट्र वैद्यकीय व्यवसाय कायद्याची अंमलबजावणी करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कायद्याची अंमलबजावणी न करणाऱ्या व बोगस डॉक्टरांची माहिती न देणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१८-०२-२०१९) :** (१) नाही, हे खरे नाही.

शासन पत्र क्र. माअअ-०७१५/प्र.क्र.११४/अधिनियम, दि. २२ सप्टेंबर, २०१५ द्वारे बोगस डॉक्टरांसंबंधी माहितीच्या संदर्भात पत्र निर्गमित करण्यात आले होते.

(२) हे, खरे आहे.

बोगस डॉक्टरांवरील कारवाईविषयी शासन परिपत्रक क्र.सीआयएम-१०९९/१७२६/प्र.क्र.३५५/९९/अधिनियम, दि. ५.०२.२००३ आणि अनधिकृत वैद्यकीय शिक्षण देणाऱ्या संस्थांवर कारवाई करण्याविषयी शासन परिपत्रक क्र. एमआयएस २००३/१०८६/प्र.क्र.३५१/०३/अधिनियम, ७ जानेवारी २००४ निर्गमित केले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

तथापि, माहितीच्या अधिकाराखाली माहिती नाकारणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कायद्यांतर्गत कारवाई केली जाते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वाडा, जव्हार, मोखाडा, विक्रमगड (जि.पालघर) येथील सर्व बालकांचे फेर सर्वेक्षण करण्याचे आदेश

**(५) ६७८२८ (१०-०१-२०१७). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा, जव्हार, मोखाडा, विक्रमगड (जि.पालघर) येथील सर्व बालकांचे चार दिवसात फेर सर्वेक्षण करण्याचे आदेश मा. आदिवासी विकास मंत्री यांनी माहे सप्टेंबर, २०१६ च्या तिसऱ्या आठवड्यात दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर जिल्ह्यामध्ये जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांपासून अंगणवाडीसेविका व मदतनीसांची पदे रिक्त असल्यामुळे फेरसर्वेक्षण करण्याची अंमलबजावणी केली गेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पदे तातडीने भरुन बालकांचे फेरसर्वेक्षण करुन तीव्र व अतीतीव्र कुपोषित बालकांवर उपचार करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१९) : (**१) व (२) हे खरे नाही.

(३) जिल्हा सेस निधीमधून वैद्यकिय अधिकारी गट-ब ची रिक्त पदे तसेच GNM/ANM ही पदे NHM अंतर्गत भरण्यात आली आहेत.

तीव्र व अतितीव्र कुपोषित बालकांवरील उपचार करण्याकरीता खालील उपाययोजना करण्यात येत आहेत :-

बालरोग तज्ञांमार्फत ० ते ६ वयोगटातील बालकांची तपासणी करुन जव्हार मोखाडा, विक्रमगड व वाडा या चार तालुक्यातील मुलांचे वैद्यकिय अधिका-यांमार्फत १११ उपकेंद्रांमध्ये सर्वेक्षण करण्यात आले. यानुसार या बालकांमधून सॅम आणि मॅम मुलांना सीटीसी मध्ये दाखल करुन बालरोगतज्ञांमार्फत तपासणी करण्यात आली. ग्रामीण रुग्णालय वाडा, विक्रमगड, मोखाडा व उपजिल्हा रुग्णालय जव्हार येथे प्रत्येकी १० मुलांवर उपचार करण्यात आले. वाडीया हॉस्पीटल, ग्लोबल हॉस्पिटल, व जसलोक हॉस्पिटल मधिल बालरोग तज्ञ व आहार तज्ञ यांचेमार्फत यांच्यामार्फत बालकांची तपासणी करुन आजारी बालकांना संदभिर्यय सेवा व पूर्ण उपचार देण्यात येत आहेत. सॅम व मॅम बालकांची दरमहा वैद्यकिय तपासणी करण्यात येते. तसेच ० ते ६ या वयोगटातील बालकांची तसेच सॅम व मॅम श्रेणीतील

बालकांची प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर वैद्यकीय शिबिर आयोजित करुन बालरोगतज्ञांमार्फत तपासणी करण्यात येवून आवश्यक उपचार करण्यात येतात.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**कोल्हापुर येथील सीपीआर रूग्णालयातून अपंगांना ऑनलाईन देण्यात येणाऱ्या दाखल्याबाबत**

**(६) ६८६७५ (१०-०१-२०१७). श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापुर येथील सीपीआर रूग्णालयातून अपंगांना ऑनलाईन देण्यात येणाऱ्या दाखल्यात गोंधळ निर्माण झाल्याचे माहे ऑगस्ट २०१६ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नूसार कोल्हापूर जिल्हयातील अपंगांना पूर्ण क्षमतेने दाखले देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) लागू नाही.

---

**ठाणे खाडी व विक्रोळी खाडी परिसरातील फ्लेमिंगो पक्षांना बंदूकीची गोळी लागल्याबाबत**

**(७) ७५२२८ (२०-०४-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.उदेसिंग पाडवी (शहादा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे खाडी व विक्रोळी खाडी परिसरातील दिनांक १२ व १५ जानेवारी, २०१७ रोजी २ फ्लेमिंगो पक्षांना बंदूकीची गोळी लागल्याने रुग्णालयात दाखल करण्याची घटना घडल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०६-०२-२०१९) :** (१) व (२) मौजे कळवा येथील गणेश विसर्जन घाट येथे दिनांक ११.०१.२०१७ रोजी एक फ्लेमिंगो पक्षी तर विक्रोळी खाडी येथे दिनांक १५.०१.२०१७ रोजी एक फ्लेमिंगो पक्षी आर.ए.डब्ल्यू. या संस्थेस जखमी अवस्थेत आढळून आले. सदर

दोन्ही जखमी अवस्थेतील फ्लेमिंगो पक्षांना त्या-त्या वेळी डॉ.रिना देव, बांद्रे या रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले होते. उपचारा दरम्यान दोन्ही फ्लेमिंगो पक्षांचा मृत्यू झाला आहे.

सदर फ्लेमिंगोचा मृत्यू हा उपासमार व अशक्तपणामुळे झाला असल्याचे शवविच्छेदन अहवालात नमूद करण्यात आले आहे. तरी अधिक चौकशी करीता वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ अंतर्गत वनगुन्ह्याची नोंद करण्यात आली असून त्या अनुषंगाने पुढील तपास सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद शहरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या कर्मचाऱ्याच्या निवासस्थानामध्ये सेवानिवृत्त कर्मचारी राहत असल्याबाबत

**(८) ९०३८७ (१९-०८-२०१७). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद शहरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या कर्मचाऱ्यासाठी असणाऱ्या बहुतांश निवासस्थानामध्ये सेवानिवृत्त कर्मचारी व त्याचे नातेवाईक राहत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार सेवानिवृत्त कर्मचारी व त्यांचे नातेवाईक रहात असलेली निवासस्थाने रिक्त करण्या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीष महाजन (१८-०२-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) सदर संस्थेतील निवासस्थाने रिक्त करण्यासाठी संस्थास्तरावर अधिकारी/कर्मचारी यांच्या टीमकडून मोहिम राबवून अनधिकृत/सेवानिवृत्त कर्मचारी राहत असलेली निवासस्थाने रिक्त करुन सिलबंद करण्यात आले आहेत व संस्थेतील पाच निवासस्थानात अनधिकृत राहत असलेल्या लोकांवर कारवाई करण्याबाबत पोलिसांना कळविण्यात आले आहे.
(४) लागू नाही.

---

## पैठण (जि. औरंगाबाद) तालुक्यातील बोगस डॉक्टरांबाबत

**(९) ९१४३० (२१-०८-२०१७). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पैठण (जि. औरंगाबाद) तालुक्यात सुमारे १०० पेक्षा अधिक  बोगस डॉक्टर प्रक्टिस करीत असून त्यांच्याविरुध्द आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, पैठण कोणतीही कारवाई करीत नसल्याचे निदर्शनास आले आहे,  हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर आरोग्य अधिकाऱ्यांस कार्यमुक्त करावे असा ठराव पंचायत समिती, पैठण यांच्या सर्वसाधारण सभेने दिनांक ७ जुन २०१७ रोजी व त्या सुमारास मंजूर केला आहे,  हे ही खरे आहे काय,

(३)  असल्यास,  याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, तदनुसार संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीष महाजन (१८-०२-२०१९) : (**१) हे खरे नाही.

औरंगाबाद जिल्हयातील पैठण तालुक्यात ४६ अनधिकृत वैद्यकीय व्यावसायीक व्यवसाय करीत असल्याचे निदर्शनास आलेले आहेत. जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयाने दिनांक ०९.११.२०१५ रोजी घेतलेल्या अनधिकृत वैद्यकीय व्यावसायीकांच्या धडक मोहिमेत एकुण ८ अनधिकृत वैद्यकीय व्यावसायीक हे व्यवसाय बंद करुन निघुन गेले. इतर २५ व्यवसायीक हे पथकाच्या धडक मोहिमेमुळे पळुन गेल्याचे निदर्शनास आले.

(२)  होय, हे खरे आहे.

पंचायत समिती पैठण यांनी दिनांक ७ जुन २०१७ रोजीच्या सर्वसाधारण सभेमध्ये तत्कालीन तालुका आरोग्य अधिकारी डॉ. बाळकृष्ण लांजेवार यांना कार्यमुक्त करण्याबातचा प्रस्ताव पारित करण्यात आलेला आहे.

(३)शासन निर्णय क्र. सीआयएम १०९१/सीआर-१७२/९१/एमईडी-८, दि.५ सप्टेंबर, १९९१, अन्वये तालुका स्तरावर समितीस अधिकार देण्यात आले आहेत.

(४) दिनांक ३० जुलै, २०१७ रोजीपासून तत्कालीन तालुका आरोग्य अधिकारी डॉ. बाळकृष्ण लांजेवार यांना तालुका आरोग्य अधिकारी यांना पदावरुन कार्यमुक्त करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उदभवत नाही.

---

**तिवसा, अमरावती,भातुकली व मोर्शी ( जि.अमरावती) या तालुक्यातील विविध गावातील नदी पात्राचे खोलीकरण व रुंदीकरण करण्याबाबत**

**(१०) ९३४०७ (१२-०८-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिवसा,  अमरावती,भातुकली व मोर्शी (जि.अमरावती) या तालुक्यातील  विविध गावातील नदी पात्राचे खोलीकरण, रुंदीकरण व सरंक्षण भिंत इत्यादीचे  कामासाठी ५० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्याबाबत   स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री यांना दिनांक १९ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१८-०२-२०१९) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

तिवसा मतदारसंघात समाविष्ट असलेल्या अमरावती, तिवसा, भातकुली व मोर्शी या तालुक्यात जलयुक्त शिवार अभियानांतर्गत एकूण ९४४ कामे पूर्ण करण्यात आली असून त्यावर रू.३४.९४ कोटी खर्च झाला आहे. सदर कामांमुळे ६९३०.०२ टि.सी.एम. पाणीसाठा क्षमता व ९३२२.८१ हे.आर. संरक्षीत सिंचन क्षेत्र निर्माण झाले आहे.

कार्यकारी अभियंता, उर्ध्व वर्धा पाटबंधारे विभाग, अमरावती मार्फत तिवसा तालुक्यातील हिंदु स्मशानभूमी बंधाऱ्याजवळील पिंगळाई नदीचे खोलीकरण व रूंदीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

कार्यकारी अभियंता, उर्ध्व वर्धा कालवे विभाग क्र.१, अमरावती यांनी अमरावती तालुक्यातील संगमेश्वर घाट व संरक्षक भिंत बांधकाम या कामाच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मंजूरी प्रदान करून प्रशासकिय मान्यतेसाठी अंदाजपत्रक जिल्हा नियोजन अधिकारी यांचेकडे सादर केले असून त्यानूसार पुढील कार्यवाही प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वरळी (मुंबई) येथील पोद्दार रुग्णालयातील विविध साधनसामुग्री खरेदीसाठी निधी उपलब्ध करण्याबाबत**

**(११) ९४८५३ (२४-१०-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.भिमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन):** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) वरळी (मुंबई) येथील पोद्दार रुग्णालयाकडून आयुर्वेदिक औषधे, अलोपथी औषधे तसेच रुग्णालयातील विविध तपासणीसाठी लागणाऱ्या प्रयोगशाळेतील अद्ययावत साधनसामुग्री खरेदी करण्यासाठी दरवर्षी सुमारे २ कोटी रुपयांच्या निधीची मागणी शासनाकडे केली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रुग्णालयास शासनाकडून दरवर्षी अर्थसंकल्पात अत्यल्प निधी उपलब्ध करुन देण्यात येतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू रुग्णालयास औषधे व साहित्य खरेदीसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीष महाजन (१६-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) संस्थेच्या मागणीनुसार पुरवणी मागणीद्वारे वाढीव अनुदान मंजूर केले जाते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील आदिवासी जिल्ह्यामध्ये पूरक आहार योजना राबविण्याबाबत.**

**(१२) ९५५०५ (२६-१२-२०१७). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १६ आदिवासी जिल्हयांमध्ये तीव्र कुपोषित(सॅम व मॅम) कमी वजनाच्या बालकांसाठी गुजरातच्या धर्तीवर विशेष पूरक आहार देण्याची योजना राबविण्याचा निर्णय राज्य शासनाने माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, टाटा ट्रस्टने नंदूरबार जिल्हयातील दोन तालुक्यातील सहा केंद्रावर तीव्र व अतितीव्र, कमी वजनाच्या बालकांना एनर्जी डेन्स न्यूट्रिशन्स फूड हा विशेष पूरक आहार दिल्यानंतर बालकांच्या आरोग्यात सुधारणा झाल्याचे टाटा ट्रस्ट युनिसेफच्या अहवालात नमूद केल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार आतापर्यंत किती आदिवासी तालुक्यातील तीव्र कुपोषित बालकांना विशेष पूरक आहार देण्यात आलेला आहे,
(४) असल्यास, कुपोषित बालकांना देण्यात येणारा विशेष पूरक आहार कोणकोणत्या कंपन्यांनी किती प्रमाणात पुरविलेला आहे व त्या कंपन्यांची नावे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१९) : (**१) होय.

राज्यातील १६ आदिवासी जिल्हयामध्ये कमी वजनाच्या बालीकांसाठी एनर्जी डेन्स न्युट्रीशियस फुड (EDNF) देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(२) होय.

जिल्हा परिषद आरोग्य विभाग, युनिसेफ मुंबई व टाटा ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने प्रायोगिक तत्वावर नंदुरबार जिल्हयात सीमॅम प्रकल्प राबविण्यात आलेला आहे. सदर प्रकल्पांतर्गत सन जुलै, २०१४ पासून ते डिसेंबर, २०१६ पर्यंत तीव्र कमी वजनाच्या बालकांना (SAM) Ready to Use Therapeutic Food (RUTF) (जागतिक दिशा निर्देशानुसार) देण्यता आलेला आहे. प्रकल्पांती प्राप्त निकषानुसार सहा तालुक्यातील एकूण उपचार केलेल्या ९४११ बालकांपैकी ६७ टक्के तीव्र कमी वजनाच्या बालकांमधील पोषणात सुधारणा (SAM to Normal) झाल्याचे आढळून आले.

(३) अद्यापपर्यंत कुठल्याही तालुक्यात पुरवठा सुरु झालेला नाही. याअनुषंगाने आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांचेकडून दिनांक १७.७.२०१७ रोजी ई-निविदा प्रकाशित करण्यात आली होती. तथापि, या निवेदाप्रक्रिये विरुध्द मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका दाखल झालेली असल्यामुळे निविदा अंतीम करण्यात आलेली नाही. त्यामुळे कुठल्याही जिल्हयाला अद्याप EDNF चा पुरवठा झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती जिल्ह्यात बालविकास प्रकल्प अंतर्गत बालकांना दिला जाणारा पौष्टीक आहार जनावारांच्या चाऱ्यासाठी दिल्याबाबत

**(१३) ९५९४५ (२६-१२-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यात बालविकास प्रकल्प अंतर्गत कुपोषित मुले, किशोरवयीन मुले, आणि स्तनदा मातांना दिला जाणारा पौष्टीक आहार पुरवठादारांमार्फत थेट जनावरांच्या चारासाठी दिल्याचे दिनांक ७ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, संबंधीत बालविकास प्रकल्प कार्यालयाने सदर पुरवठादारांना पशुपालकांना पौष्टीक आहार विकण्याचे मुकसंमती दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय

(४) असल्यास, तदनुसार संबंधीत अधिकारी व पुरवठादारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१९) :**(१) नाही.

तथापि, दिनांक ७ सप्टेंबर, २०१७ च्या सकाळ वृत्तपत्रातील Today अमरावती येथे बालकांचा पौष्टीक आहार जनावरांच्या घशात या आशयाची बातमी प्रसिद्ध झाली आहे.

(२) नाही.

(३) व (४) सदर बातमीच्या अनुषंगाने विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास, अमरावती विभाग यांनी दिनांक ७ सप्टेंबर, २०१७ रोजी तातडीने बैठक आयोजित केली होती. या बैठकीला उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाक), जि.प. अमरावती, तिन्ही प्रकल्प व नागरी प्रकल्पांच्या सर्व पर्यवेक्षिका उपस्थित होते. सदर विषयी विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास, अमरावती विभाग यांनी तीन सदस्यीय चौकशी नेमली. या समितीने MIDC भागांमधील गुरांच्या विविध गोठयांना अचानक व तात्काळ भेटी देऊन पाहणी केली. यात अंगणवाडीमध्ये देण्यात येणारा आहार किंवा त्या आहाराचे पॅकेंगचे पोते यापैकी काहीही आढळून आलेले नाही. तसेच या समितीने दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी MIDC परिसरातील बिटमधील सर्व अंगणवाडी सेविकांची बडनेरा येथे बैठक घेऊन त्यांना याबाबत माहिती विचारली व त्योच रेकॉर्ड तपासणी केली असता सर्व रेकॉर्ड व्यवस्थित असल्याचे आढळून आले. तसेच पौष्टीक आहार विकण्याचे कोठेही निदर्शनास आले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## केंद्र शासनाच्या निर्देशानुसार महिला व बालविकास विभागाकडून पोषण आहार योजनेअंतर्गत गहू व तांदळाचे जिल्हावर मंजूर करण्यात आलेल्या नियतनाची माहितीची मागणी

**(१४) १००९६५ (२६-१२-२०१७). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या निर्देशानुसार माहे २०१७-१८ सालामध्ये महिला व बालविकास विभागाकडून पोषण आहार योजनेंतर्गत गहू व तांदळाचे जिल्हावार मंजूर करण्यात आलेल्या नियतनाची माहितीची मागणी लोकप्रतिनीधींनी आयुक्त, एकात्मिक सेवा योजना यांचेकडे दिनांक ७ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास पत्रान्वये केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाचे गहू आधारीत पोषण आहार योजनेअतंर्गत माहे जानेवारी २०१७ ते मार्च २०१७ या तिमाही करीता गहू व तांदळाचे नियमन वितरीत केले अशा सर्व तिमाहीची नियमन वितरण हे कोणत्या ठिकाणाहून व केंव्हा करण्यात आली त्याची सविस्तर आकडेवारी काय आहे,

(३) असल्यास, नियतनाची प्रकल्पनिहाय यादी व ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील बालके, गरोदर व स्तनदा माता, कमी वजनाची बालके यांना देय असल्याचे प्रमाणात अधिन राहून गहू व तांदळाची उचल करण्यात आली असल्यास त्याची जिल्हावार सविस्तर माहिती काय आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१९) : (**१) होय.

(२) संबंधीत जिल्हापरिषदांचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाक) यांचेमार्फत गहु व तांदुळाचे नियतन संबंधित बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्याकडे वितरणासाठी सुपूर्द करण्यात येवून त्यांचेमार्फत आहार पुरठा करणाऱ्या बचतगट/ महिला मंडळांना नियतन वितरीत केले जाते. संबंधित महिला मंडळ/ बचतगट हे त्यांना वितरीत केलेल्या नियतनानुसार अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून धान्याची उचल करतात.

(३) होय.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील आयुर्वेद आणि युनानी रसशाळा कार्यरत करण्याबाबत**

**(१५) १०१३४४ (२७-१२-२०१७). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासकीय आयुर्वेदीक महाविद्यालयाची संख्या चार असून त्यामध्ये नांदेड जिल्हयातील आयुर्वेद आणि युनानी रसशाळेतून सुरूवातीला राज्यभराला औषधी पुरवठा केला जात होता, हे खरे आहे काय

(२) असल्यास, गेल्या तीन वर्षापासून कच्चा माल खरेदीची दरच ठरविण्यात आले नसल्यामुळे कोटयवधी रूपयाची यंत्रणा विनावापर पडून असल्याची बाब माहे नोव्हेंबर मध्ये निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय.

(३) तसेच, उक्त रसशाळेत ३.१८ लाखाची औषधी शिल्लक असताना जिल्हा परीषद आरोग्य केंद्र, आयुक्त यांनी उत्तरखंडातील एनआरएचएम एका फार्मसीकडून औषधे खरेदी करीत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय.

(४) असल्यास, सदर रसशाळा कार्यरत करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास,ि विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीष महाजन (१६-०२-२०१९) :**(१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

(४) शासकीय आयुर्वेद व युनानी रसशाळा, नांदेड या रसशाळेमधील कच्ची औषधी द्रव्ये व पॅकिंग मटेरियल खरेदी प्रक्रियेशी संबंधित शासन निर्णय दि.०१.०२.२००८ व दि.२२.०४.२०१३ अन्वये होणारा वेळेचा अपव्यय व खरेदीसाठी लागणारा विलंब टाळण्यासाठी तसेच रसशाळेद्वारा उत्पादित ओषधांच्या किंमती निश्चित करण्यासाठी व इतर समस्यांचे निराकरण

करण्यासाठी अस्तित्वात असलेल्या त्रिस्तरीय समितीची पुनर्रचना करुन शासन निर्णय दि.०१.०३.२०१८ अन्वये स्थानिक पातळीवरच "कार्यकारी समिती" व "नियामक समिती" गठीत केली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील कुपोषणाचा प्रश्न सोडविण्यासाठी खासगी संस्थामार्फत राबविण्यात येणारे प्रकल्प**

**(१६) १०२१३१ (२६-१२-२०१७). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कुपोषणाचा प्रश्न सोडविण्यासाठी शासनाने कोट्यावधी रुपये खर्च करुन विविध योजना राबवूनही कुपोषणाचा प्रश्न सोडविण्यास शासनाला अपयश आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील ७ आदिवासी जिल्हयातील ४०० गावांमध्ये कुपोषण निर्मुलनासाठी खासगी संस्थामार्फत प्रकल्प राबविण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे व त्यानुषंगाने कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१९) : (**१) नाही.
(२) व (३) वेगवेगळया संस्थांमार्फत राज्यातील वेगवेळया जिल्हयात प्रकल्प राबविण्यात येतात. उदाहरणार्थ टाटा ट्रस्ट मार्फत पालघर जिल्हयातील पोषण व आरोग्य सुधारणांवर तसेच अंगणवाडीचे दुरुस्तीचे कामांवर भर देण्यात येत आहे. तसेच अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना क्षमताबांधणी प्रशिक्षण देण्यात येत आहे.

---

**कर्जत (जि. रायगड) तालुक्यातील कुपोषित बालके असलेल्या अंगणवाडयांमध्ये एकात्मिक बालविकास सेवा योजना सुरु करण्यात आली नसल्याबाबत**

**(१७) १०२२७६ (२६-१२-२०१७). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कर्जत (जि. रायगड) तालुक्यातील कुपोषित बालकांच्या मृत्यूनंतर आदिवासी भागातील कुपोषित बालकांसाठी आदिवासी विकास विभागाने ५ लक्ष रुपयांचा निधी रायगड परिषदेकडे दिलेला असूनसुध्दा तालुक्यातील कुपोषित बालके असलेल्या अंगणवाडयांमध्ये एकात्मिक बालविकास सेवा योजना (व्हिसीडीसी) सुरु करण्यात आली नसल्याचे माहे आक्टोबर,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अंगणवाडयांमध्ये दिनांक ३० ऑक्टोबरपूर्वी गाव पातळीवर व्हीसीडीसी सुरु करण्याच्या सूचना असुनसुध्दा अद्यापपर्यंत याबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कुपोषण कमी करण्यासाठी महत्वाची जबाबदारी असलेल्या एकात्मिक बालविकास विभाग आणि आरोग्य विभागात समन्वय नसल्याचे दिसून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, एकात्मिक बालविकास सेवा योजना त्वरीत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१९) : (**१) नाही.
(२) व (३) नाही.

एकात्मिक बाल विकास सेवा योजना कर्जत-१ अंतर्गत दि.१२.२.२०१८ पासून एकूण ४० ग्राम बाल विकास केंद्रामध्ये १६ सॅम व ७१ मॅम अशी एकूण ८७ बालके दाखल केली असून ५ सॅम व २९ मॅम बालकांची सुधारणा झाली आहे.

तसेच, कर्जत-२ प्रकल्पांतर्गत एकूण ४९ ग्राम बाल विकास केंद्रामध्ये समॅम ३४ व मॅम ८९ अशी एकूण १२३ बालके दाखल केली असून १९ सॅम व ३४ मॅम बालकांची सुधारणा झालेली आहे.

एकात्मिक बाल विकास विभाग व आरोगय विभाग यांच्या समन्वयाने आदोग्य तपासणी, लसीकरण करण्यात येवून संदर्भ सेवा देण्यात येतात.
(४) कर्जत तालुक्यातील दोन्ही प्रकल्पात एकूण ८९ ग्राम बाल विकास केंद्र स्थापन केली असून ५० सॅम व १६० मॅम बालके दाखल केली असून २४ सॅम व ६३ मकॅम बालकांची सुधारणा झाली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील अंगणवाडयांसाठी लागणाऱ्या अन्नधान्याची देयके प्रलंबित असल्याबाबत**

**(१८) १०७३३४ (०४-०४-२०१८). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील अंगणवाडयासाठी घेण्यात येणाऱ्या अन्नधान्याची देयके माहे मार्च, २०१७ पर्यंत दिली नसल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,
(३) तसेच कोल्हापूर जिल्हयातील ठेकेदारांपासून अंगणवाडयासाठी घेतलेल्या अन्नधान्याची देयके लवकरात लवकर देण्यात यावीत म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०७-२०१८) :** (१) होय.

(२) एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत पोषण आहारासाठी केंद्र शासनाकडून ५०% व राज्य शासनाकडून ५०% निधी मंजूर करण्यात येतो. पोषण आहारासाठी सन २०१७-१८ या वित्तीय वर्षाकरीता १२३६ कोटीचा APIP (Annual Programme Implementation Planning) केंद्र शासनास सादर करण्यात आला होता. तथापी केंद्र शासनाकडून ९९३ रुपये कोटीचा APIP मंजूर करण्यात आला आहे. मंजूर APIP प्रमाणे राज्य शासनाने निधी वितरीत केला असून उपलब्ध निधीच्या प्रमाणात पोषण आहाराची देयके पारीत करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

(३) सन २०१७-१८ हया वित्तीय वर्षातील मार्च, २०१८ अखेरपर्यंतची देयके अदा करण्यासाठी निधी वितरीत करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सावंतवाडी (जि. सिंधुदुर्ग) तालुक्यातील अनेक शिवारातील शेतांमध्ये वन्य प्राणी शेताची व पिकांची नासधूस करीत असल्याबाबत**

**(१९) १०८१०६ (३१-०३-२०१८). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावंतवाडी (जि. सिंधुदुर्ग) तालुक्यातील अनेक शिवारातील शेतांमध्ये हत्ती, गव्हे-रेडे, माकड, सांबर इत्यादी वन्य प्राणी मोठया प्रमाणात शेताची व पिकांची नासधूस करीत असल्याचे माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागाचा शासन निर्णय क्र. विकेस-२००९/प्र.क्र.१८८/का-१७ दिनांक ३१-३-२०१०, वन्य प्राण्यापासून आदिवासी शेतकऱ्यांच्या शेतीच्या संरक्षणासाठी सौर उर्जेवर आधारीत तारेचे कुंपन (सोलर कुंपण) बांधण्याच्या योजनेस मान्यता देणे, असा शासन निर्णय काढला होता, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदर शासन निर्णय कोकणातील शेतकऱ्यांना लागु करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री यांना निवेदन दिलेले आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, सदर शासन निर्णय लवकरात लवकर कोकणातील शेतकऱ्यांना लागु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-०२-२०१९) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) वन्यप्राण्यांमुळे शेतपिकांचे होणार नुकसान टाळण्याकरीता डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजनेअंतर्गत लोखंडी जाळीचे कुंपण उभारण्याची योजना महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.डब्ल्यूएलपी-०५१७/ प्र.क्र.९७ /फ-१, दिनांक२१ मार्च, २०१८ अन्वये कार्यान्वित करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उदभवत नाही.

---

**मौजा अजनी आणि फुलाआमला (ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती) येथील भुसंपादन केलेल्या जमिनीचा मोबदला प्रलंबीत असल्याबाबत**

**(२०) १०८७३० (०७-०४-२०१८). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.रणजीत कांबळे (देवळी), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा अजनी भू. सं. प्र. क्र. ४९/४७/२०१२-१३ आणि मौजा फुलाअमला भू. सं. प्र. क्र.५०/४०/२०१२-१३ (ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती) प्रकरणी २ वर्षापासून संबंधित जमीन भुधारकांना मोबदला मिळाला नसल्याने मागणीनुसार स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १२ फेब्रुवारी २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी रुपये ११८३.८७ लक्षची मागणी शासनाकडे करण्यात आली असून निधी उपलब्ध नसल्याने कलम १९ किंवा २३ अन्वये कोणतीही घोषणा किंवा अंतिम निवाडा पारीत करण्यासाठी कामे प्रलंबीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधीत भुधारकांना निधी उपलब्ध करुन देणेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०२-०२-२०१९) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) साठवण तलाव अजनी फुलआमला या प्रकल्पाची मंजूर किंमत रु. ९.८४ कोटी असून प्रकल्पावर आतापर्यत रु. ८.८४ कोटी खर्च झाला आहे. आता प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमीनीचा भूसंपादन मोबदला अदा करण्यासाठी आवश्यक असलेल्या रु. १२.५९ कोटी निधीची मागणी शासनाकडे प्राप्त आहे. सदर वाढीव खर्चासाठी सुधारित प्रशासकिय मान्यता आवश्यक असून, त्याबाबतचा प्रस्ताव शासनाचे विचाराधीन आहे. त्याशिवाय प्रलंबित भूसंपादन प्रकरणांचा निधी सुधारित प्रशासकिय मान्यतेच्या अधीन अदा करण्याची बाबही शासनाचे विचाराधीन आहे. वरीलपैकी ज्या प्रस्तावावर प्रथम निर्णय होईल, त्याप्रमाणे प्रकल्पाच्या भूसंपादन प्रश्नांकित निधी हा निधीच्या उपलब्धतेनुसार त्वरेने अदा करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात सर्पदंशामुळे मृत्यू व्यक्तींच्या संख्येत झालेली वाढ**

**(२१) १०९४५८ (०७-०४-२०१८). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे एप्रिल ते ऑक्टोबर, २०१७ या सात महिन्याच्या कालावधीत सर्पदंशामुळे मृत्यू पावलेल्या व्यक्तींची संख्या २४४३७ इतकी असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्पदंशावर उपाय सूचविण्याच्या सूचना केंद्र शासनाने केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१४-०२-२०१९) :** (१) राज्यात सर्प दंशामुळे मृत्यू पावलेल्या व्यक्तीची नोंद वनविभागाव्दारे घेतली जात नसल्याने राज्यात सर्पदंशामुळे किती व्यक्ती मृत्यू पावले आहे याची माहिती वनविभागाकडे उपलब्ध नाही. तथापि, हाफकिन प्रशिक्षण, संशोधन व चाचणी संस्था, मुंबई यांच्या आकडेवारी प्रमाणे एप्रिल-२०१७ ते डिसेंबर-२०१७ या कालावधीत ३३६७३ सर्पदंशांची नोंद झाली आहे.

(२) सर्पदंशावर उपाय सुचविण्याच्या सूचना केंद्र शासनाकडून वनविभागाकडे प्राप्त झालेल्या नाही.

(३) व (४) प्रश्न उदभवत नाही.

---

## उल्हासनगर (जि.ठाणे) या शहरीभागात कुपोषणाचे प्रमाण वाढल्याबाबत

**(२२) ११०७९४ (१८-०४-२०१८). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्यातील आदिवासी भागात कुपोषणाचे प्रमाण दिसून येते हे सत्य असून आता शहरी भागातसुध्दा कुपोषणाचा प्रश्न वाढत असून माहे सप्टेंबर व आक्टोबर २०१७ मध्ये व त्या दरम्यान दोन कुपोषित बालके आढळून आल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, उल्हासनगर महापालिका क्षेत्रासाठी बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) हया शासकीय अधिकाऱ्याच्या मार्फत सदर योजनेसाठी कोटयावधी रुपयाची तरतूद करूनही बालकांचे आरोग्य, पोषण आहार इत्यादी बाबत त्यांचे कडून दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या विषयी शासनाने चौकशी केली आहे काय वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, चौकशीनुसार या प्रकरणी दोषी असलेल्या अधिकाऱ्या विरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच कुपोषणग्रस्तांबाबत काय प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाचे कारण काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१९) : (**१) माहे ऑक्टोबर,२०१७ च्या मासिक प्रगती अहवालानुसार बाल विकास प्रकल्प अधिकारी उल्हासनगर या प्रकल्पांतर्गत कुपोषणाची स्थिती खालीलप्रमाणे आहे

| प्रकल्पाचे नांव | एकूण वजन घेतलेली बालके | सर्व साधारण बालके | मध्यम कमी वजनाची बालके | तीव्र कमी वजनाची बालके |
|---|---|---|---|---|
| उल्हासनगर | १३२०७ | १०७०९ | २४२७ | ७१ |
| उल्हासनगर बदलापूर | ६३१५ | ५३२४ | ९५८ | ३३ |

(२) हे खरे नाही.

उल्हासनगर मनपा क्षेत्रामध्ये एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत उल्हासनगर व उल्हासनगर बदलापूर असे २ प्रकल्प कार्यरत असून उल्हासनगर प्रकल्प २१० अंगणवाडया व उल्हासनगर बदलापूर १३९ अंगणवाडया याप्रमाणे एकूण ३४९ अंगणवाडया आहेत. या प्रकल्पातील अंगणवाडी सेविकामार्फत अंगणवाडीतील ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील लाभार्थी, गर्भवती, स्तनदा माता, तीव्र कमी वजनाची मुले यांना THR व ३ वर्ष ते ६ वर्ष वयोगटातील लाभार्थ्यांना गरम ताजा आहाराचा पुरवठा करण्यात येतो. तसेच लसीकरण व औषधोपचार हे सार्वजनिक आरोग्य विभागाकडून करण्यात येते.

(३), (४) व (५) प्रश्न उदभवत नाही.

---

**सिंदेवाही (जि.चंद्रपूर) तालुक्यातील जंगलामधून जाणाऱ्या रस्त्यांच्या दुरुस्तीकरीता निधी मिळण्याबाबत**

**(२३) ११०८५१ (३१-०३-२०१८). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) : :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदेवाही (जि.चंद्रपूर) तालूक्यातील जंगलामधून जाणाऱ्या रस्त्यांच्या दुरूस्तीकरीता अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, चंद्रपूर यांच्यावतीने उपसंचालक, बफर ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपुर यांच्यामार्फत अंदाजपत्रकासह प्रस्तावास अंतिम मंजूरी मिळण्याकरीता वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे दिनांक २७ जानेवारी २०१७ रोजी वा त्यादरम्यान पाठविलेला असतांना सदर प्रस्तावास अद्यापही मंजूरी मिळालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाकडे जाणाऱ्या एकूण ११ पोहच रस्त्यांवरील कामापैकी ९ पोहच रस्त्याची कामे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात समाविष्ट करण्याबाबत विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१४-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्ह्यातील बाल संरक्षण समित्याबाबत**

**(२४) ११२२१२ (०४-०४-२०१८). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बाल संरक्षण, बालहक्क व बालकांचा सहभाग वाढविणे याबरोबरच बालकाला व त्याच्या कुटुंबाला आधार मिळेल अशा योजना त्यांच्यापर्यंत पोहचविण्यासाठी सरकारने गाव, तालुका, प्रभाग व शहरस्तरावर बालसंरक्षण समित्या स्थापन केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोलापूर जिल्ह्यात महिला व बालविकास विभागने गावस्तरावर १०५२ व शहरस्तरावर ९ समित्या स्थापन केल्या आहेत परंतु जनजागृतीअभावी व शासनाकडून कोणत्याही प्रकारचा निधी मिळाला नसल्यामुळे या समित्या कागदावरच राहिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, त्यानुसार सदरहु बाल संरक्षण समितीचे कार्य सर्वसमावेशक चालु ठेवणेकरिता निधी देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०२-२०१९) : (**१) होय .
(२),(३) व (४) बाल संरक्षण कक्षात प्राप्त निधीतून सदर समित्यांच्या सदस्य सचिव यांचे कर्तव्य व जबाबदारी याविषयी प्रशिक्षण घेण्यात आलेले आहे.
बाल संरक्षणात कार्यरत असणाऱ्या यंत्रणांच्या प्रशिक्षणाकरिता केंद्र शासनाकडे निधीची मागणी करण्यात आली आहे, निधी प्राप्त करुन घेण्याकरति पाठपुरावा करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औसा (जि. लातूर) तालुक्यातील अंगणवाड्यांमध्ये निकृष्ट दर्जाची न्याहारी दिली जात असल्याबाबत.**

**(२५) ११३३०२ (१०-०४-२०१८). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा (जि. लातूर) तालुक्यात बालविकास प्रकल्प विभागाअंतर्गत अंगणवाड्यांमध्ये दर आठवड्याचा खाद्यपदार्थाचा तक्ता ठरलेला असतानाही अंगणवाड्यामधून सकाळची न्याहारी तक्यानुसार न देता निकृष्ट दर्जाचा पिवळा भात देत असल्याचे माहिती दिनांक २६ डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची चौकशी शासनाने केली आहे काय,

(३) असल्यास, औसा तालुक्यातील एकूण १९८ अंगणवाड्यांमधील १२ हजार ८९५ बालकांपैकी ४४ कुपोषित बालकांची संख्या शून्यावर आणण्यासाठी सकस व संतुलित आहाराऐवजी निकृष्ट दर्जाचा पुरवठा करणाऱ्या संबंधित पर्यवेक्षक व बालविकास प्रकल्प अधिकारी यांचेविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१९) :** (१) नाही.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अनाथ मुलांना शासनाकडून विविध योजनांचा लाभ मिळण्याबाबत**

**(२६) ११३७७१ (०४-०४-२०१८). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनाथ मुलांची देखभाल करण्यासाठी शासनाची बालगृहे आहेत मात्र हेच अनाथ मूल जेव्हा अठरा वर्षांचे होते तेव्हा ते निराधार होते, त्यांना शासनाकडून कोणताही आधार मिळत नाही ही बाब दिनांक ८ जानेवारी २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुलांसाठी शासनाने विविध योजना लागू करण्याबाबत तसेच आधारकार्ड, रेशनकार्ड, पॅनकार्ड मिळावे यासाठी शासनाने उपाययोजना केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०२-२०१९) :** (१) नाही.

विशेषगृह / बालगृहामधील १८ वर्ष पुर्ण झालेल्या व बालगृहातून बाहेर पडणाऱ्या प्रवेशितांना अनुरक्षण गृहामध्ये ०३ वर्षासाठी म्हणजे वयाची २१ वर्ष पूर्ण होईपर्यंत प्रवेश दिला जातो. तसेच अपवादात्मक परिस्थितीमध्ये म्हणजेच जर एखाद्या प्रवेशिताचे शिक्षण/ प्रशिक्षण अपुर्ण असेल तर त्याचे शिक्षण/प्रशिक्षण पुर्ण होईपर्यंत त्याला संस्थेतील प्रवेशासाठी मुदत वाढ दिली जाते.

(२) व (३) होय.

सदर मुलांना रेशनकार्ड, रहिवासी दाखला, तसेच मतदान ओळखपत्र अशी कागदपत्रे तात्काळ उपलब्ध करुन देणे बाबत शासन परिपत्रक दिनांक ३० जुलै, २०१३ अन्वये निर्गमित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगाव जिल्हा परिषदेअंतर्गत पाझर तलावासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला न मिळाल्याबाबत

**(२७) ११५०४९ (०४-०४-२०१८). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हयात विविध ठिकाणी पाझर तलावासाठी एकूण किती जमीन संपादित करण्यात आली, त्यापैकी किती जमिनींचा मोबदला अद्याप दिलेला नाही,

(२) असल्यास, मोबदल्याची रक्कम किती कालावधीत शेतकऱ्यांना देण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२०-०२-२०१९) :** (१) जळगाव जिल्हा परिषद लघुसिंचन विभागांतर्गत पाझर तलावाकरिता ७१४.२० हेक्टर जमीन संपादित करण्यात आली असून संपादित जमीनीचा मोबदला अदा करण्याचे प्रलंबित आहे.

(२) जिल्हा परिषद जळगाव यांनी शासनाकडे रु. १६.५१ कोटी निधीसाठी मागणी केली आहे. राज्यातील सर्व जिल्हा परिषदांकडील तातडीच्या भूसंपादन प्रकरणांकरिता सन २०१८ च्या हिवाळी अधिवेशनामध्ये पुरवणी मागणीद्वारे रु. ५०.०० कोटी विशेष निधीची तरतूद करण्यात आली आहे. सदर निधी वित्त विभागाकडून वितरणासाठी उपलब्ध झाल्यानंतर वैधानिक विकास मंडळ निहाय क्षेत्रीय यंत्रणेकडे पुढील वितरणासाठी सुपुर्द करण्याची बाब शासनाचे विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती जिल्हा परिषदेअंतर्गत अंगणवाडी केंद्राना पुरविण्यात येणाऱ्या पुरक पोषण आहारामध्ये धान्य कमी देत असल्याबाबत

**(२८) ११५४१३ (०४-०४-२०१८). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हा परीषदेअंतर्गत एकात्मीक बालविकास योजना प्रकल्प आदिवासी व ग्रामीण भागातील अंगणवाडी केंद्राना पुरक पोषण आहार पुरवठा करणारे पुरवठादार मे. गायत्री

महिला बचत गट जळका, चांदूर बाजार (जि.अमरावती) यांनी २ वर्षापासून अंगणवाडी केंन्द्रांना प्रत्येक बॅग मध्ये धान्य कमी देत असल्याच्या तक्रारी ही बाब विभागीय आयुक्त, महीला व बालविकास, अमरावती यांच्या दिनांक ३० नोव्हेंबर, २०१७ रोजीच्या अहवालामध्ये सिध्द झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अहवालाच्या अनुषंगाने दिनांक १८ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.मंत्री महिला व बालविकास यांना पत्र दिले असता त्यावर तात्काळ कारवाई करण्याचे निर्देश जा.क्र.मंत्री/ग्राविवि.मवबा/व्हिआयपी/११ अन्वये सचिव, महिला व बालकल्याण यांना दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,सदर निर्देशाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

अमरावती जिल्हयामध्ये मे.गायत्री महिला संस्था यांचे मार्फत कच्च्या धान्याचा पुरवठा केला जातो. मे.गायत्री महिला संस्था यांनी फक्त माहे मार्च,२०१७ मध्ये पुरवठा केलेल्या तुरडाळीच्या कट्टयामध्ये अडीच ते तीन किलो तुरडाळ कमी असल्याचे आढळून आले होते. कमी पुरवठा फक्त माहे मार्च,२०१७ मध्ये झाल्याचे आढळून आले आहे. दोन वर्षापासून कमी पुरवठा केल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(२) होय.

(३) पुरवठादार संस्थेला कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून पुरवठादार मे.गायत्री महिला संस्थेने कमी पुरवठा केलेली तुरडाळ अंगणवाडीत उपलब्ध करुन दिली आहे. तसेच कमी पुरवठा केल्याबद्यल ज्या अंगणवाडयांना कमी पुरवठा केलेला आहे त्या ठिकाणी कमी आहार पुरवठा देयकाच्या दुप्पट रक्कम दंड वसूल करण्याबाबत संबंधितांना आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांचेकडून निर्देश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील स्वयंसेवी बालगृहांचे अनुदान थकित असल्याबाबत.**

**(२९) ११६६७० (२५-०७-२०१८). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर),**

**श्री.जयकुमार गोरे (माण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.सुनिल केदार (सावनेर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ९०० स्वयंसेवी बालगृहाच्या संदर्भात महाराष्ट्र राज्य बाल न्याय(मुलांची काळजी व सरंक्षण) नियम २०१५ लागू केल्याने कमी अनुदानात जाचक नियमाचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक केल्याने बालगृहचालकांत अस्वस्थता निर्माण झाली असल्याचे दिनांक ५ एप्रिल,२०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नियमावलीतील कलमानुसार बालगृहांसाठी कर्मचारीवर्गाचा आकृतीबंध निश्चित करण्यात आला असून ५० मुलांसाठी ३० कर्मचारी व कलम ३१ (२) नुसार बालकांच्या निवासासाठी तब्बल आठ हजार चौरस फूट जागेची इमारत बंधनकारक केले असले तरी कर्मचा-यांच्या वेतनासाठी व निवासासाठी इमारतीला लागणारे भाडे तसेच भोजन अनुदानाची तरतूदही शासनाने केली नसल्यामुळे अनुदानाअभावी बालगृहचालकांना आर्थिक विवचंनेस सामोरे जावे लागते,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्वयंसेवी बालगृहांचे मागील दोन वर्षांचे सुमारे ७० कोटी रुपयांचे अनुदान थकित असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४)असल्यास, महाराष्ट्र राज्य बाल न्याय(मुलांची काळजी व सरंक्षण) नियमावलीत काही अटी शिथिल करण्याबाबत तसेच राज्यातील स्वयंसेवी बालगृहातील अनुदान तातडीने देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०२-२०१९) :** (१) व (२) नाही,

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५, व त्यानुसार केंद्रशासनाच्या आदर्श नियमावलीच्या आधारे शासनाने बालगृहासाठी निकष निश्चित करण्यात आले आहेत.

(३) सन २०१५-१६ आणि सन २०१६-१७ या वर्षाचे मुल्यनिर्धारण आणि अंतिमीकरणाअंती देय होणार अनुदान अदा करण्यात येत आहे. त्यापैकी ११.१९% प्रमाणे माहे मार्च, २०१८ अखेर अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथे नवजात अर्भकांच्या विक्रीबाबत**

**(३०) ११६८३९ (२४-०७-२०१८). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथील एका डॉक्टरने अल्पवयीन आणि विधवा मतांची बेकायदेशीर प्रसूती करून दोन अर्भके मुंबई आणि नवरगाव येथील दोन दाम्पत्यांना विकत दिले असल्याचे माहे फेब्रुवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले ,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने याप्रकरणातील संबधित दोषीवर कारवाई करण्याबाबत व अर्भके चोरीचे प्रमाण आटोक्यात आणण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०२-२०१९) :** (१) होय.

(२) व (३) मा. चेअरमन व सदस्य कारा ॲडवायझरी कमिटी, दिल्ली यांच्या पथकाने दि. ०६/०२/२०१८ रोजी जवाहरनगर, इचलकरंजी येथील डॉ. अरुण पाटील यांच्या जनरल सर्जिकल व मॅटर्निटी हॉस्पिटल येथे छापा टाकला यावेळी बेकायदेशीर रित्या कुमारी माता व विधवांची प्रसुती करण्यात येवुन नवजात बालकांची विक्री केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे.

सदर भेटीच्यावेळी डॉ.अरुण पाटील हे अल्पवयीन व विधवा स्त्रियांची प्रसुती करुन सदर बालके अपत्य नसणाऱ्या पालकांना विकत असल्याचे आढळुन आले असुन याबाबत डॉ.अरुण पाटील यांच्यावर गु.र.नं. ३०/२०१८ नुसार भा.द.वि.स. कलम ३७०, १७६, ३४ व बाल न्याय अधिनियम २०१५ मधील कलमानुसार इचलकरंजी, पोलिस स्टेशन येथे गुन्हा नोंद करण्यात आला असुन याबाबत पुढील कार्यवाही शिवाजीनगर पोलिस स्टेशन इचलकरंजी यांचेकडून सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर शहरातील बालुसधारगृहातून बालगुन्हेगारांनी केलेले पलायन**

**(३१) ११७०३४ (२३-०७-२०१८). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संजय कदम (दापोली), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील सदर बझार परिसरातील बालसुधारगृहातून विविध गुन्हयाखाली पकडलेल्या चार बालगुन्हेगारांनी बालसुधारगृाचे अधिक्षक व संबंधित रक्षक कर्मचा-यांच्या निष्काळजीपणामूळे पलायन केल्याची घटना दिनांक २० एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे ,

(२) असल्यास,सदर प्रकरणी सोलापुर सदर बाजार पोलिस ठाण्यात अपहरण बाबतचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या बालगुन्हेगारांना कोणकोणत्या गुन्हयाखाली व केव्हा अटक करण्यात आली होती,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार पलायन केलेल्या बालगुन्हेगारांचा तपास करण्याच्यादृष्टीने व याप्रकरणास जबाबदार असणा-या संबधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०२-२०१९) :** (१) सोलापूर शहरातील सदर बजार परिसरातील बाल सुधार गृहातुन विविध गुन्हयाखाली पकडलेली दोन विधीसंघर्षग्रस्त बालके आणि काळजी व संरक्षणाची गरज असलेली दोन बालके यांनी दि २० एप्रिल २०१८ रोजी संबंधित काळजी वालक व पोलीस सुरक्षा रक्षक यांच्या निष्काळजीपणामुळे पलयान केले आहे.

(२) होय,

(३) सदर विधीसंघर्षित बालकांना अटक केलेल्या गुन्हयाचा तपशील खालीलप्रमाणे आहे,

१. विधीसंघर्षग्रस्त बालक मोहोळ पोलीस ठाणे गु.र. नं. ६६८/१८ भा.दं.वि. ३९४, ३४ दि. २९/३/२०१८

२. विधीसंघर्षग्रस्त बालक JC १९४/१७ दि. २९/३/२०१८

३. काळजी व संरक्षणाची गरज असलेली २ बालके-बाल न्याय (मुलांचे काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ मधील कलम २(१४) ७ दि. २७/३/२०१८ व दि. ११/४/२०१८

(४) होय,

(५) सदर घटनेला संबंधित काळजी वाहक जबाबदार असल्याने काळजी वाहकावर संस्थांतर्गत चौकशी समिती मार्फत चौकशी चालू आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात बालमृत्यू आणि कुपोषण रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजने संदर्भात**

**(३२) ११७५९३ (२५-०७-२०१८). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती दिपिका चव्हाण**

**(बागलाण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात होणारे बालमृत्यू आणि कुपोषण रोखण्यासाठी अंगणवाडीच्या आवारात (परसबागेत) ताजी फळे,भाज्या निर्मितीची योजना राज्य शासनाने सुरु करण्याचा निर्णय माहे मार्च,२०१८ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी महिला बालविकास विभाग आणि रिलायन्स फाऊंडेशन यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, आतापर्यंत राज्यातील किती अंगणवाडीच्या आवारात ताजी फळे,भाज्या निर्मिती करण्याची योजना कार्यान्वित करण्यात आली आहे,

(४) तसेच, सदर योजना कार्यान्वित झाली नसेल तर सदर योजना कार्यान्वित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१९) : (**१) व (२) होय.

(३) रिलायन्स फाऊंडेशन यांच्या मदतीने ८ जिल्हयातील ७३७९ इतक्या अंगणवाडीच्या आवारात परसबागांची निर्मिती करण्यात आली आहेत.

(४) रिलायन्स फाऊंडेशन यांच्या मदतीने ठाणे, पालघर, जळगांव, यवतमाळ, परभणी, पुणे, उस्मानाबाद, वर्धा ह्या जिल्हयात एकूण ७३७९ इतक्या पारसबागांमधून तयार होणाऱ्या भाजीपाल्याचा लाभ १०७३५४ इतक्या लाभार्थ्यांना झालेला आहे व त्याचे परिणामही चांगले दिसून येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील अनाथाश्रम शासनाच्या थकीत अनुदानामुळे बंद असल्याबाबत.**

**(३३) ११७९०४ (२४-०७-२०१८). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील शासनाच्या थकित अनुदानामूळे ११७ पैकी केवळ १० अनाथाश्रम सुरु असुन यामध्ये केवळ १८५ विद्यार्थी असून त्यापैकी एकाही विद्यार्थ्याकडे प्रमाणपत्र नसल्याचे दिनांक ९ एप्रिल,२०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निराधार, अनाथ बालकांना आसरा मिळावा यासाठी शासनाने बालगृह सुरु केले आहे मात्र बालन्याय (मृतांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ अंतर्गत केवळ अनाथ मुलांनाच बालगृहात प्रवेश दयायचा असे धोरण आखल्याने अनाथाश्रमातील प्रवेशप्रक्रिया बंद पडली असून सन २०१४ पासून अनाथाश्रमाचे अनुदान थकल्याने हे अनाथाश्रम चालविणारे

संस्थाचालकही आर्थिक विवचंनेत आहेत तसेच अनाथाश्रमासाठी लागणारा खर्चही शासनस्तरावरुन देण्यास टाळाटाळ होत असल्याने अनाथश्रामामध्ये असण्या-या बालकांची व सदर अनाथाश्रम चालविणा-या संस्थाचालकाची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही कली वा करण्यात येत आहे ,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०२-२०१९) :** (१) व (२) नाही.
बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ च्या कलम २ (१४) मध्ये काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांची व्याख्या दिलेली आहे. या व्याख्येमध्ये बसणाऱ्या बालकांना बाल कल्याण समितीमार्फत बालगृहात प्रवेश दिला जातो. त्यामुळे नांदेड जिल्हयामध्ये बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ च्या कलम २ (१४) मध्ये नमूद व्याख्येमध्ये बसणाऱ्या एकूण १८५ बालकांना बाल कल्याण समितीने दाखल प्रवेश आदेश दिलेले आहेत.

तसेच जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्या मागणीनुसार त्यांना प्राप्त अनुदानाच्या तुलनेत तरतूद उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

## नाटळ (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) या गावातील नाटळ नदीच्या पुनरुज्जीवन उपक्रमाच्या कामाबाबत

**(३४) ११८२९७ (२४-०७-२०१८). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाटळ (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) या गावातील नाटळ नदीच्या पुनरुज्जीवन उपक्रमाचे काम नाटळ ग्रामविकास मंडळ व नाम फाऊंडेशन यांच्या सहकार्याने सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ९ कि.मी. लांब नदी पात्रातील गाळ उपसा करण्याच्या कामास जलसंधारण अंतर्गत पाटबंधारे विभागाने मान्यता दिली आहे,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गाळ उपश्या बरोबरच आवश्यक त्या ठिकाणी गॅबियन व भूमिगत बंधारे जलसंधारण विभागाच्या अंतर्गत बांधण्यात येणार आहेत,हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या नदीपात्राच्या गाळ उपसणे, गॅबियन व भूमिगत बंधारे बांधण्याचे काम किती दिवसात पूर्ण करण्यात येणार आहे व यासाठी जलसंधारण विभागाकडून कोणत्या सुविधा पुरविण्यात आल्या आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१८-०२-२०१९) :** (१), (२), (३) व (४)

कणकवली (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील नाटळ या गावातील नाटळ पुनरुज्जीवन उपक्रमाचे काम नाटळ ग्राम विकास मंडळ यांच्या सहकार्याने करण्यात आलेले असून नाम फाऊंडेशनच्या सहकार्याने करण्यात आलेले नाही.

सरचिटणीस, नाटळ ग्रामविकास मंडळ यांनी ९ कि.मी.लांब नदीतील गाळ उपसा करण्याची परवानगी मिळणेबाबत सादर केलेल्या प्रकरणी कार्यकारी अभियंता, मध्यम प्रकल्प विभागीय पथक, आंबडपाल यांनी दि.१२/४/२०१८ रोजी नदीतील गाळ काढण्यास मान्यता दिली असून सदर काम नाटळ ग्राम विकास मंडळ व लोकसहभागाद्वारे पूर्ण करण्यात आले आहे.

सदरचे काम जलसंधारण विभागामार्फत करण्यात आलेले नसून सदर कामासाठी जलसंधारण विभागाकडून कोणत्याही प्रकारची साधनसामुग्री पुरविण्यात आलेली नाही.

---

**महिला व बालविकास विभागातील अधिकाऱ्यांनी गैरव्यवहार केल्याबाबत.**

**(३५) ११८७८६ (३१-०७-२०१८). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बालविकास संस्थाचालक व कर्मचारी संघटनेने मा.राज्यपाल, मा.मुख्यमंत्री इत्यादींना लेखी पत्र पाठवून महिला व बालविकास विभागातील अधिकाऱ्यांनी आर्थिक गैरव्यवहार करत असून मुलांचे संस्थेतील खोटे प्रवेश दाखवून बालकाश्रम चालविणाऱ्या मर्जीतील संस्थाचालकांना अनुदान वाटपातील रकमा देऊन कोटयावधी रुपयांचा गैरव्यवहार करत असल्याबद्दलच्या लेखी तक्रारी केल्याची बाब दिनांक ७ मे २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यात किती कोटीचा गैरव्यवहार झाला असल्याचे आढळून आले,

(३) तसेच, महिला व बालविकास विभागांतर्गत बीड जिल्हयातील संस्थांना अनुदान वाटपात सन २०१७-१८ या वर्षात सव्वासहा कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे मे, २०१८ च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या गैरव्यवहारांची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले.

(५) असल्यास, चौकशीनुसार संबधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,

(६) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०२-२०१९) :** (१) बालविकास संस्था चालक व कर्मचारी संघटना, लातूर या संघटनेकडून अशा आशयाचे निवदेन प्राप्त झालेले आहे.
(२), (३), (४) व (५) सदर प्रकरणी आयुक्तालय स्तरावरुन पथक तयार करण्यात येवून बीड जिल्हयातील संस्थांना अनुदान वाटपाबाबत तपासणी करण्यात आलेली आहे. सदर तपासणीचे अहवालानुसार आढळून आलेल्या गंभीर त्रुटींबाबत संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.
(६) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

**राज्यात नविन उज्वला केंद्रे सुरु करण्याबाबत..**

**(३६) १२०१७१ (२४-०७-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील प्रत्येक जिल्हयात वेश्या व्यवसायासाठी फसवून आणलेल्या महिला व मुलींना आधार देण्यासाठी सरकारकडून उज्वला केंद्रे सुरु करण्याचा निर्णय महिला व बालविकास विभागाने माहे मे २०१८ मध्ये वा त्यादरम्यान घेतला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नवीन व आधीच्या उज्वला केंद्राना शासन ४० टक्के अनुदान देणार आहे, हे ही खरे आहे काय.
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय.
(४) असल्यास, त्यानुसार व्यवसायिक प्रशिक्षण पुर्ण करणा-या वारंगनाना उद्योग सुरु करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना अंमलात आणल्या वा येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०२-२०१९) : (**१) होय.
(२) नाही.
उज्वला केंद्र पुरस्कृत योजना असून सदर योजनेच्या निकषानुसार मान्यता प्राप्त संस्थांकरीता देण्यात येणाऱ्या अनुदानामध्ये केंद्रशासनाचा हिस्सा ६० टक्के असून राज्य शासनाच्या ३० टक्के व १० टक्के हिस्सा योजना राबविणाऱ्या संस्थेचा राहणार आहे.
(३) व (४)
सदर योजनेअंतर्गत संस्थेत दाखल प्रवेशितांना अन्न, वस्त्र, निवारा, वैद्यकीय, कायदेशीर, मनोरंजनात्मक औपचारीक व अनौपचारीक शिक्षण, समुपदेशन, व्यवसायिक प्रशिक्षण यासारख्या सुविधा पुरविण्यात येतात. तसेच दाखल प्रवेशिता इतर राज्यातील व देशातील असल्याने त्यांची मायदेशी रवानगी करणेबाबत प्राधान्याने कार्यवाही करण्यात येते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अकोला येथील गोरक्षण रोडवरील बाल निरीक्षण गृहातील गैरव्यवस्था

**(३७) १२०५८६ (२४-०७-२०१८). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला येथील गोरक्षण रोडवरील बाल निरीक्षण गृहात खुनाच्या आरोपातील मुलांनी दोन बालकांवर अनैसर्गिक कृत्य केल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नियमानुसार विधी संघर्षग्रस्त बालकांना स्वतंत्र खोलीत ठेवणे अनिर्वाय असताना घटनेवेळी आरोपी मुले व इतर मुले एकाच खोलीत असल्याचे निदर्शनास आले,हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रस्तुत प्रकरणी चौकशी करण्याकरिता अध्यक्ष, बालकल्याण समिती यांनी पाच सदस्यांची समिती नेमली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रस्तुत प्रकरणासंदर्भात नेमण्यात आलेल्या समितीचा अहवाल प्राप्त करुन बाल निरीक्षण गृहाच्या गैरव्यवस्थेस जबाबदार असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द कारवाई करण्यासह पुन्हा अश्या घटना घडू नये यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०२-२०१९) :** (१) व (२) होय.

(३) होय. सदर प्रकरणी जिल्हा महिला बाल विकास अधिकारी यांच्या आदेशाने सदस्य, बालकल्याण समिती यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी गठीत करण्यात आली आहे.

(४) व (५) सदर घटनेच्या अनुषंगाने संस्थेतील कर्मचाऱ्यांना ज्ञापन देण्यात आले असून त्याबाबतचा खुलासा मागविण्यात आलेला आहे.

तसेच सदर प्रकरणी खदान पोलीस स्टेशन, अकोला येथे गुन्हा नोंदविण्यात आले असून, खदान पोलिस स्टेशन अकोला यांच्या मार्फत पुढील तपास सुरु आहे.

सदर प्रकरणी संस्थेतील कर्मचाऱ्यांना दक्षता घेणेबाबत सूचना देण्यात आल्या आहेत, तसेच प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यात येत आहेत.

---

## राज्यातील अनाथ मुला-मुलींना आरक्षण देण्याच्या निर्णयाबाबत

**(३८) १२२३५८ (२५-०७-२०१८). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनाथ बालकांना सरकारने खुल्या प्रवर्गात शिक्षण व नोकरीमध्ये १ टक्के समांतर अरक्षण देण्याबाबत झालेली अनियमितता आणि त्यामुळे बालन्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ भारतीय राज्यघटनेच्या कलम १४.१५(३) चा भंग होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनाथ बालकांना सरकारने खुल्या प्रवर्गात शिक्षण व नोकरीमध्ये १ टक्के समांतर अरक्षण देण्याबाबत शासनाच्या या निर्णयासंदर्भात शुद्धिपत्रक काढण्याची आवश्यकता असल्याबाबतची कारणमीमांसा विषद केलेले पत्र स्थानिक लोकप्रतिनीधी यांनी दिनांक १७ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास शासनास दिले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०२-२०१९) :** (१) नाही.
(२) होय.
(३) व (४) सदर प्रकरणी विधी व न्याय विभागाचे अभिप्राय मागविण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंगरुळपीर (जि.वाशीम) तालुक्यातील जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत.**

**(३९) १२४४१२ (३१-०७-२०१८). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंगरुळपीर (जि.वाशीम) तालुक्यातील कृषी विभागाच्या गैर कारभारामुळे जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत सन २०१६-१७ मधील मंजूर असलेल्या व काही पूर्ण झालेल्या कामात दिरंगाई झाल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यातील अनेक कामे मोजमापवही प्रमाणे न करता निकृष्ट दर्जाची केली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, त्यानुसार संबंधीत दोषी कंत्राटदार व अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१८-०२-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शाळकरी विद्यार्थ्यांना पोषक आहार मिळावा यासाठी मा. सर्वोच्च न्यायालयांनी ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्वाचे पालन होत नसल्याबाबत.**

**(४०) १२५७१३ (२५-०७-२०१८). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शाळकरी विद्यार्थ्यांना पोषक आहार मिळावा यासाठी पुरवठा करावयाचे क्षेत्र हे छोटे असावे अशी मार्गदर्शक तत्वे मा. सर्वोच्च न्यायालयांनी घालून दिली आहेत ,हे खरे आहे काय,

(२) असलयास,मा. मुंबई उच्च न्यायालयाने देखील मा. सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वांचा उल्लेख त्यांच्या निकालात केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात महिला व बाल विकास विभागाकडून सदरची मार्गदर्शक तत्वे पाळण्यात येत नाहीत ,हे खरे आहे काय,

(४) असल्यास, महिला व बाल विकास विभाग जिल्हानिहाय पुरवठदारांची यादी जाहीर करुन त्यापैकी ज्या पुरवठादारांनी मा. न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वाचे उल्लंघन केले आहे त्याच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१९) : (**१) हे खरे नाही.

मा.सर्वोच्च न्यायालयाचे अंगणवाडीतील लाभार्थ्यांना आहार पुरवठा करण्यासाठी कंत्राटदार नेमण्यात येऊ नयेत, आहार पुरवठा महिला मंडळ/महिला संस्था/ बचत गटांमार्फत करण्यात यावा असे आदेश दिले आहेत. त्यानुसार राज्यात महिला मंडळ/ महिला संस्था/ बचत गट यांचेमार्फत आहार पुरवठा सुरु आहे.

(२) होय.

(३) हे खरे नाही.

महिला व बाल विकास विभागाने गरम ताजा आहार पुरवठयासाठी निविदा मंजुरीचे काम जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समितीमार्फत करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार प्रत्येक प्रकल्प कार्यालयात पुरवठाधारक महिला मंडळ/ बचत गटांची यादी उपलब्ध आहे. राज्यामध्ये एकूण ३९,००० महिला मंडळ/ बचतगटांमार्फत गरम ताजा आहाराचा पुरवठा करण्यात येत आहे. तसेच THR पुरवठयाचे काम १८ महिला संस्थांना मा.सर्वोच्च न्यायालयाचे दि.१९.०४.२०१७ च्या आदेशानुसार दिलेले आहे. त्याचा शासन निर्णय महिला व बाल विकास विभागाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

(४) मा.न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वांचे कोणत्याही बचतगटांनी उल्लंघन केले असल्याचे अद्याप निदर्शनास आले नाही. त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**एकात्मिक बालविकास योजनेंतर्गत देण्यात येणारा पोषण आहार योजना बंद केल्याबाबत**

**(४१) १२६६९७ (०७-१२-२०१८). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहूल मोटे (परांडा), श्री.संजय कदम (दापोली), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.मधुसूदन केंद्रे (गंगाखेड), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ११ ते १८ वयोगटातील किशोरवयीन मुलींच्या विकासामध्ये पोषण आहाराचे महत्त्व ओळखून त्यांना एकात्मिक बाल विकास योजनेंतर्गत देण्यात येणारा गरम ताजा पोषण आहार बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे दिनांक १ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना बंद करण्याचे निदेश नुकतेच दिले असले तरीही मागील काही महिन्यांपासून हा गरम ताजा पोषण आहार मुलींना मिळत नसल्याचे निदर्शनास आले, हे हि खरे आहे काय,

(३)असल्यास, या योजनेमधील लाभार्थींचा वयोगट बदलुन नव्याने योजना सुरु करण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचेही निदर्शनास आले आहे , हे ही खरे आहे काय,

(४)असल्यास, नवीन योजना कार्यान्वित होण्यापूर्वी सद्य:स्थितील सुरु असलेली योजना बंद झाल्यामुळे राज्यातील किशोरवयीन मुली पोषण आहारापासून वंचित रहावे लागत असल्याने सद्य:स्थितीतील योजना पुढे सुरु ठेवण्याबाबत लोकप्रतिनिधींनी पत्राव्दारे शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, किशोरवयीन मुलींच्या विकासासाठी महत्वाचे असलेले शालेय पोषण अहार योजना पुन्हा सुरु करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१९) : (**१) होय.

(२), (३), (४) व (५) किशोरवयीन मुलींना १ सप्टेंबर, २०१८ पासुन ताजा गरम आहार बंद करण्यात आलेला आहे. १ सप्टेंबर, २०१८ पूर्वी किशोरवयीन मुलींना गरम ताजा आहार देण्यात येत होता. केंद्र शासनाच्या सुधारित निकषानुसार ११ ते १४ वयोगटातील शाळाबाहय किशोरवयीन मुलींना आहार देण्याच्या केंद्र शासनाच्या निर्णयानुसार यानिर्णयाची राज्यात अंमलबजावणी करण्याबाबतचा प्रस्ताव मा.मंत्रीमंडळाच्या मान्यतेकरीता सादर करण्यात आलेला आहे. राज्यातील संपूर्ण जिल्हयांसाठी ११ ते १४ या वयोगटातील शालाबाहय किशोरवयीन मुलींसाठी योजना (Scheme for Adolescent Girl) सुरु करण्यासाठीच्या प्रस्तावावर मंत्रिमंडळाच्या मान्यतेनंतर राज्यात योजनेची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासनाच्या लोकसेवा हमी कायद्याअंतर्गत वन विभागाने जनतेला सेवा उपलब्ध करुन दिली नसल्याबाबत.**

**(४२) १२८३१६ (०७-१२-२०१८). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने लोकसेवा हमी कायदा लागू केला असला तरी राज्याच्या वन विभागाने या कायद्यांतर्गत २७ महिन्यांपासून जनतेला सेवा उपलब्ध करुन दिली नसल्याची माहिती माहे,मार्च २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ८०० पेक्षा जास्त कार्यालय प्रमुखांनी प्रथम आणि द्वितीय अपिलीय अधिकाऱ्यांची नेमणूक केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यामुळे नागरिकांना लोकसेवा हमी कायद्यांतर्गत सेवा मिळत नसल्याने सदर कायद्याअंतर्गत जनतेला सेवा न देण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदर कायद्याची अंमलबजावणी तातडीने करून जनतेला या कायद्याअंतर्गत सेवा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०२-२०१९) : (**१)हे खरे नाही.

महाराष्ट्र लोकसेवा हमी अधिनियम, २०१५ मधील तरतुदीनुसार वन विभागामार्फत एकूण ११ सेवा देण्यात येतात. अर्जदारांकडून आवश्यक दस्तऐवजांची पूर्तता झाल्यानंतर सेवा पुरविली जात असते.
(२) हे खरे नाही

महाराष्ट्र लोकसेवा हमी अधिनियम, २०१५ मधील तरतुदीनुसार सेवा पुरविण्याकरिता प्रथम अपील प्राधिकारी आणि द्वितीय अपील प्राधिकारी यांची नेमणूक करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) सदर कायद्याअंतर्गत जनतेला सेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बिलोली (जि.नांदेड) तालुक्यातील ऐतिहासिक निजामकालीन तलावावर होणारे अतिक्रमण**

**(४३) १२८४७२ (०५-१२-२०१८). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव)** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बिलोली (जि.नांदेड) तालुक्यातील ऐतिहासिक असलेल्या निजामकालीन १०१ एकर जागेवर असलेल्या तलावावर अनेक शेतक-यांनी ६० एकर जागेवर अतिक्रमण केले असून या तलावात पाणीसाठी उपलब्ध होऊनही या तलावाचे तुंबच फोडले असल्याने तलावाच्या खालच्या पातळीवरील २०० एकर वरील भात शेती धोक्यात आली असल्याचे माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील तलावाचे सर्व हक्क लघु पाटबंधारे विभागाकडे असूनही या अतिक्रमणाकडे लघु पाटबंधारे विभागाने दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, सदरील तलावाच्या नुतनीकरणासाठी शासनाने ९ कोटींचा निधी मंजूर केला असून सदर निधीचा विनियोग कोणत्या कामासाठी करण्यात आला ,
(४) असल्यास, उक्त तलावाच्या जागेवर झालेले अतिक्रमणाकडे दुर्लक्ष करण्या-या संबधितावर कारवाई करण्यासह सदर तलावावर होणारे अतिक्रमण रोखण्यासह तलावाचे नुतनीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१८-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही. तथापि, तलावातील गाळ व तलावाच्या दुरूस्ती अभावी पूर्ण क्षमतेने सदर तलावाचा वापर होत नसल्याने तलावातील पाणी कमी झाल्यावर शेतकरी गाळ पेरा घेतात.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) सदर तलावाची जमीन निश्चित करण्यासाठी भूमी अभिलेख कार्यालयाकडून मोजणी करून घेण्याच्या सूचना उपविभागीय कार्यालयास देण्यात आल्या आहेत.

तलावाच्या उजव्या बाजूकडील सांडवा व दोन्ही बाजूकडील तुंब (Sluice Wells) नादुरूस्त असल्याने लाभार्थ्यांनी दुरूस्तीची मागणी केली आहे. त्यानुषंगाने प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, औरंगाबाद यांनी तलावाच्या दुरूस्तीच्या अनुषंगाने पाहणी केलेली असून त्यानुसार सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्याचे काम विभागस्तरावर चालू आहे. या वर्षी सदर तलावस्थित गावाचा समावेश जलयुक्त शिवार अभियान आराखड्यात झाल्याने तलावातील गाळ काढणे व तलावाची दुरूस्तीचे काम प्रस्तावित करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**श्रीगोंदा (जि.अहमदनगर) शहराजवळील कापसे वस्तीजवळील भूखंडावर अतिक्रमण झाल्याबाबत**

**(४४) १२८८०१ (३०-११-२०१८). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा (जि.अहमदनगर) शहराजवळील कापसे वस्तीजवळ असलेल्या गट नंबर १८७२ (अ) या महसूल प्रशासनाच्या ताब्यात असलेल्या मोकळया भूखंडावर मोठया प्रमाणात अतिक्रमण झाल्याचे माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मोकळया जागेवर अतिक्रमण करण्यासाठी दिनांक २३ जुलै, २०१८ रोजी वा त्यासुमारास दोन गटात मारामारी होऊन अनेक लोक त्यात जखमी झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त शासकीय जागेवर होणारे अतिक्रमण थांबविण्यासाठी व करण्यात आलेले अतिक्रमण निष्कासित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१५-०२-२०१९) :** (१) होय हे खरे आहे.

सदर भूखंडावर माहे जुलै २०१८ मध्ये अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) सदर जागेवर अतिक्रमण करण्यासाठी दोन गटात मारामारी झाल्याबाबत श्रीगोंदा पोलीस ठाण्यात कोणताही गुन्हा दाखल नाही.

(३) व (४) सदर जागेवरील अतिक्रमण दिनांक २७/०७/२०१८ रोजी निष्कासित करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सुकाळी बु (ता.सेनगांव, जि.हिंगोली) येथील बंधा-यातील पाणी साठा कमी होत असल्याबाबत**

**(४५) १२९६१० (०५-१२-२०१८). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुकळी बु (ता.सेनगांव, जि.हिंगोली) येथे जलयुक्त शिवार योजनेंतर्गत बांधण्यात आलेल्या बंधा-याला पाझर फुटल्यामुळे साठलेल्या पाण्याला गळती लागल्याने पाणी साठा कमी होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बंधा-यांत सुरु असलेली पाणी गळती लवकरात लवकर थांबविण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१८-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.
मृद व जलसंधारण विभाग, नांदेड या उपविभागाचे कनिष्ठ अभियंता यांनी सदरील बंधाऱ्यांची स्थळ पाहणी पंचनामा केलेला असून पंचनाम्यानूसार बंधाऱ्यातून पाणी गळती होत नसल्याचे आढळून आले आहे.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चिखलदरा (जि. अमरावती) येथील जलयुक्त शिवार योजनेंतर्गत बांधण्यात आलेल्या बंधाऱ्यांच्या बांधकामात झालेला गैरव्यवहार

**(४६) १३०३७९ (०५-१२-२०१८). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिखलदरा (जि. अमरावती) येथील जलयुक्त शिवार योजनेंतर्गत विविध यंत्रणामार्फत बांधण्यात आलेल्या बंधा-यांच्या बांधकामात संबंधित अधिका-यांनी व कंत्राटदारांनी आदिवासी शेतक-यांची फसवणूक करून आर्थिक गैरव्यवहार केला असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी परिसरातील आदिवासी बांधवानी दिनांक २ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने या गैरव्यवहाराची चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, त्यानुसार संबधित दोषी अधिकारी व कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा. राम शिंदे (१८-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) याबाबत निवेदन/पत्र संबंधित यंत्रणेकडे प्राप्त नसल्याचे जिल्हाधिकारी, अमरावती यांनी कळविले आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भगुरत (ता.जि. नाशिक) येथील अंगणवाडीस निकृष्ट दर्जाचा आहार पुरविला जात असल्याबाबत.

**(४७) १३१२१६ (०७-१२-२०१८). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भगुर (ता.जि. नाशिक) येथील अंगणवाडी क्र.६० मधील बालकांना निकृष्ट दर्जाचा आहार पुरविण्यात येत असल्याची तक्रार पालकांनी बालविकास प्रकल्प अधिकारी यांच्याकडे नोंदविली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, बाल विकास अधिकारी यांनी सदर अंगणवाडीला भेट देवून तक्रार नोंदवून घेतली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अंगणवाडीतील बालकांना १५ दिवस आहार पुरवठा न करताही अंगणवाडी सेविका यांनी स्वत:च्या अधिकारात रुक्मिणी बचत गटाच्या नावाने खोटे चलन भरुन सादर केलेले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार उक्त अंगणवाडीस पुरविण्यात येणारा आहाराचा योग्य दर्जा राखण्यासह रुक्मिणी बचत गटाच्या नावाने खोटे चलन सादर करण्या-या अंगणवाडी सेविकेवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१९) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अहमदपूर व चाकूर (जि.लातूर) तालुक्यातील पाझर तलावाच्या दुरुस्तीबाबत

**(४८) १३३२६४ (०५-१२-२०१८). श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदपूर व चाकूर (जि.लातूर) तालुक्यात सन २०१६ मध्ये झालेल्या अतिवृष्टी मुळे नादुरुस्त झालेल्या पाझर तलावांच्या दुरुस्तीचे प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील पाझर तलाव दुरुस्तीचे कामे जलयुक्त शिवार योजनेंतर्गत असूनही दुरुस्तीची कामे झाली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लातूर जिल्ह्यातील या व्यतिरीक्त बऱ्याच गावांमध्ये जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत कामे झालेली नाहीत, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१८-०२-२०१९) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

जलयुक्त शिवार अभियानांतर्गत अहमदपूर व चाकूर तालुक्यात सन २०१५-१६ व २०१६-१७ मधील दुरूस्तीची कामे लातूर पाटबंधारे विभाग, लातूर यांचेमार्फत करण्यात आलेली आहेत. तसेच जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, लातूर यांचेमार्फत सन २०१७-१८ व २०१८-१९ मध्ये अहमदपूर व चाकूर तालुक्यात एकूण ३७ दुरूस्तीची कामे हाती घेण्यात आली आहेत.

जिल्हा जलसंधारण अधिकारी, जिल्हा परिषद, लघुपाटबंधारे विभाग, लातूर अंतर्गत अहमदपूर व चाकूर तालूक्यात जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सन २०१५-१६ ते २०१८-१९ या कालावधीत एकूण ९६ कामे प्रस्तावित केलेली असून सन २०१५-१६ ते २०१७-१८ वर्षातील कामे पूर्ण झालेली असून उर्वरीत सन २०१८-१९ वर्षातील कामे प्रगतीपथावर आहेत.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वर्धा जिल्ह्यातील गोजी लघु पाटबंधारे प्रकल्पग्रस्तांना जमिनीचा मोबदला देण्याबाबत

**(४९) १३३६८५ (०७-१२-२०१८). श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्धा जिल्ह्यातील गोजी लघु पाटबंधारे प्रकल्पासाठी तेथील शेतकऱ्यांच्या जमिनी शासनाने संपादीत केल्या होत्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या जमिनीचा मोबदला देण्याबाबत मा. न्यायालयाने एक वर्षापूर्वी आदेश देवूनसूध्दा अद्यापही शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला तात्काळ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२०-०२-२०१९) :** (१) होय.
(२) व (३) अंशत: खरे आहे.

शासन निर्णय दिनांक ३१/०५/२०१७ अन्वये २५१ ते ६०० हे. प्रकल्प मृद व जलसंधारण विभागाकडे सोपविण्यात आले आहेत. त्यास अनुसरुन ५३० हे. सि. क्ष. असलेल्या गोजी

तलाव प्रकल्पाचे दस्तऐवज कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभागाकडून प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, नागपूर यांचेकडे हस्तांतरित करण्यात आले आहेत. त्यानुसार प्रस्तुत प्रकरणी भूसंपादनाचे एकूण १६ प्रकरणे असून, ४ प्रकरणे यापूर्वीच निकाली काढण्यात आली आहेत. उर्वरित १२ भूसंपादनाच्या प्रकरणांमध्ये दिवाणी न्यायालय, वर्धा यांनी वाढीव मोबदला देण्याचे आदेश पारित केले आहेत. सदर आदेशाविरुध्द मा. उच्च न्यायालयात अपील करावे किंवा कसे याबाबत विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेण्यासाठी प्रस्तावित करण्यात आले आहेत. त्यापैकी ५ प्रकरणामध्ये विधी व न्याय विभागाचे अभिप्राय प्राप्त असून ते विचारात घेऊन निधी मागणी संदर्भातील कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतित आहे. तसेच उर्वरित ७ प्रकरणात विधी व न्याय विभागाचे अभिप्राय प्राप्त होताच पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सिल्लोड (जि.औरंगाबाद) येथील उपजिल्हा रुग्णालयातील अनियमितेबाबत**

**(५०) १३३७८५ (११-१२-२०१८). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिल्लोड (जि.औरंगाबाद) येथील उपजिल्हा रुग्णालयाची तपासणीत केली असता तेथे मोठया प्रमाणात अनियमितता निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथे रुग्णांसाठी असलेल्या औषधांचा तसेच शस्त्रक्रिया करण्यासाठी लागणारे साहित्याचा उपयोग न करता ते शौचालयात लपवून ठेवण्यात आल्याचे निदर्शनास आले ,हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(४)असल्यास, त्यानुसार याप्रकरणात संबंधित असलेल्या दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२०-०२-२०१९) : (**१) नाही.

(२) नाही.

(३), (४) व (५) या प्रकरणी जिल्हा शल्य चिकीत्सक, औरंगाबाद यांच्या पथकामार्फत साहित्य भांडाराची तपासणी करण्यात आलेली आहे. सिल्लोड (जि.औरंगाबाद) येथे ५० खाटांच्या असलेल्या ग्रामीण रूग्णालयाचे रूपांतर उपजिल्हा रुग्णालयात करण्यात आल्याने जागेच्या कमतरतेमुळे जुन्या बाह्यरूग्ण विभागामध्ये लिनन व फर्निचर ठेवण्यात आले होते. त्यावेळी बाह्यरूग्ण विभागामध्ये येणारे नागरिक/पत्रकार त्याबाबत विचारणा करित होते, मोबाईलवर

फोटो काढीत होते. याबाबत वर्तमानपत्रातही बातमी छापून आली होती. त्यामुळे रूग्णालयामध्ये पत्रकार परिषद घेऊन, जुन्या बाह्यरूग्ण विभागामध्ये लिनन व फर्निचर ठेवण्यात आल्याचे स्पष्ट करून ती औषधे असल्याचा गैरसमज दूर करण्यात आला.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.